## 1. दर्जा आणि भूमिका :

### प्रस्तावना :

समाज ही परस्पर संबंधाची एक व्यवस्था आहे.समाजातील हे परस्पर संबध प्रत्यक्षात व्यक्ती - व्यक्तीमधील असतात.असे असले तरी सामाजिक सरंचेनेच्या दृष्टीने विचार करता व्यक्ती - व्यक्तीमधील परस्पर संबंध हे व्यक्ती या नात्याने नसतात तर व्यक्ती समाजातील ज्या स्थानावर असतात त्या स्थानामधील ते परस्पर संबंध असतात.व्यक्तीचे तिच्या समूहातील किंवा समाजातील जे स्थान असते तेच सामाजिक स्थान होय.प्रत्येक सामाजिक स्थानाला दोन पैलू असतात.एक हक्क आणि विशेषाधिकार तर दुसरा म्हणजे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या होय.सामाजिक स्थानाचे हे दोन पैलू म्हणजेच दर्जा आणि भूमिका होय.दर्जा आणि भूमिका एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे ...

### ❖ दर्जा :

कोणत्याही समाजात प्रत्येक व्यक्ती अनेक स्थानाशी निगडीत असते त्यामुळे अनेक प्रकाराच्र दर्जे व्यक्तीला लागू होतात.व्यक्ती समूहात ज्या स्थानावर असते त्या स्थानाचे हक्क आणि विशेषाधिकार व्यक्तीला प्राप्त होतात.अशा हक्क आणि विशेषाधिकार यालाच दर्जा असे म्हणतात.समाजातील व्यक्तीचे स्थान म्हणजे दर्जा होय.

### ➢ व्याख्या :

#### १.राल्फ लिंटन :

‘दर्जा म्हणजे एखाद्या विशिष्ठ समाजव्यवस्थेत विशिष्ठ काळी,एखाद्या विशिष्ठ व्यक्तीला असलेले स्थान होय’.

**२.पार्सन :**

'भूमिकेचा स्थानात्मक पैलू म्हणजे दर्जा होय'.

**३.इलियट व मेरील :**

'व्यक्ती तिचे वय,लिंग,कुटुंब,वर्ग,व्यवसाय,विवाह आणि कर्तुत्व याच्या आधारावर समुहात जे स्थान प्राप्त करीत असते त्याला दर्जा असे म्हटले जाते'.

दर्जा म्हणजे व्यक्तीचे समूहातील स्थान होय असे वरील व्याख्यांच्या आधारे दिसून येते.एकच व्यक्ती अनेक प्रकारचे दर्जे समाजात भूषवत असते.उदा.मुलगा,वडील,नागरिक,राजकीय पुढारी,इंजनियार,प्राध्यापक,डॉक्टर,इ.

➢ **दर्जाचे प्रकार :**

काही दर्जे समाजाने व्यक्तीला बहाल केलेले असतात तर काही दर्जे व्यक्तीने स्व प्रयत्नाने मिळावलेले असतात.या आधारावरतीच **राल्फ लिंटन** यांनी सामाजिक दर्जाचे दोन प्रकार स्पष्ट केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे .....

**१.अर्पित दर्जा :**

जो दर्जा व्यक्तीला समाजात आपोआप,कोणतेही कष्ट न करता मिळत असतो त्याला अर्पित दर्जा किंवा प्रदत्त दर्जा असे म्हटले जाते.जो दर्जा व्यक्तीला जन्मताच प्राप्त होतो,ज्यासाठी व्यक्तीला कोणतेही प्रयत्न करावे लागत नाहीत तो अर्पित दर्जा म्हणून ओळखला जातो.हा दर्जा व्यक्तीचा जैविक घटकांशी संबधित असतो.वय,लिंग,कुटुंब तसेच जातीचे सदस्यत्व यानुसार प्राप्त होणारा हा

दर्जा व्यक्तीच्या कर्तुत्वावर अवलंबून नसतो.उदा.भारतातील जातिव्यवस्थेनुसार प्राप्त होणारा दर्जा ..

### ❖ अर्पित दर्जाचे निर्धारण करणारे घटक :

१. लिंग -

२. वय -

३. आप्तसंबध -

४. जात -

5. धर्म -

6.वंश -

आज समाजात अर्पित दर्जाला असलेले महत्व कमी होत चालले आहे,अर्पित दर्जापेक्षा आज अर्जित दर्जाला महत्व वाढत चालले आहे.

### २. अर्जित दर्जा :

जे स्थान अथवा दर्जा व्यक्ती आपल्या स्वप्रयत्नाने प्राप्त करते त्याला अर्जित दर्जा असे म्हटले जाते.अर्जित दर्जा आपोआप मिळत नाही.हा दर्जा प्राप्त करण्यासाठी व्यक्तीकडे काही गुणकौशल्ये,क्षमता,पात्रता असाव्या लागतात.संपत्ती,सत्ता,शिक्षण,व्यवसाय,कलाकौशल्ये इत्यादीच्या आधारे व्यक्तीने मिळवलेला दर्जा अर्जित दर्जा ठरत असतो.हा दर्जा कायामस्वरूपी असू शकत नाही,त्यामध्ये बदल होवू शकतो.उदा.आज श्रीमंत असणारी व्यक्ती उद्या गरीब होउ शकते.

आजच्या आधुनिक युगात अर्जित दर्जाला जास्त महत्व प्राप्त झालेले आहे.गुणवत्ता,शौर्य,पराक्रम,चिकाटी याच्या जोरावर व्यक्ती स्वतासाठी पद निर्माण

करू शकते.शास्त्रज्ञ,पंतप्रधान,उद्योगपती,विचारवंत,खेळाडू,कलाकार हि सर्व पदे व्यक्ती स्व कर्तुत्वावर प्राप्त करत असते.

## ❖ अर्जित दर्जा निर्धारण करणारे घटक :

१.शिक्षण -

२. व्यवसाय -

३.सत्ता -

४. कलाकौशल्ये -

5.संपत्ती -

वरील निर्धारण करणाऱ्या घटकांच्या आधारे व्यक्ती अर्जित दर्जा प्राप्त करत असते.

## ❖ भूमिका :

समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीला विविध निकषानुसार अर्पित किंवा अर्जित दर्जा प्राप्त होत असतो.या दर्जाला अनुसरून आणि प्रथा,परंपरा,नियम,कायदे यांच्या अधीन राहून व्यक्तीला जे कार्य करावे लागते त्यालाच भूमिका असे म्हटले जाते.याचाच अर्थ व्यक्ती समूहात ज्या स्थानावर असते,त्या स्थानाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या तिला पार पाडाव्या लागतात.या कर्तव्यांना व जबाबदाऱ्यानां भूमिका असे म्हणतात.उदा.वडील हा दर्जा असतो आणि त्या दर्जाशी निगडीत कुटुबांची काळजी घेणे,कुटुंबावर नियंत्रण ठेवणे ही कर्तव्ये त्यांना पार पाडावी लागतात.याचाच अर्थ हक्क आणि कर्तव्ये या गोष्टी दर्जाशी निगडीत असतात आणि दर्जाची कर्तव्यात्मक बाजू म्हणजे भूमिका असते.

➢ **व्याख्या :**

**१.राल्फ लिंटन :**

‘दर्जा किंवा स्थानाचे क्रियाशील स्वरूप म्हणजे भूमिका होय.’

‘भूमिका म्हणजे स्थानाचा गतिशील पैलू होय’.

**२.इली चिनॉय :**

‘भूमिका म्हणजे विशिष्ठ दर्जा असणाऱ्या व्यक्तीला करावे लागणारे अपेक्षित वर्तन होय’.

**३.पार्सन :**

‘दर्जाचे कृतीत रुपांतर होणे म्हणजे भूमिका होय’.

➢ **भूमिकेची वैशिष्ट्ये :**

**१.भूमिका वठविणे :**

प्रत्येक व्यक्ती आपापल्या भूमिकेप्रमाणे वागण्याचा जो प्रयत्न करते त्याला भूमिका वठविणे असे म्हणतात.

**२.भूमिका वर्तन :**

भूमिका करणाऱ्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष वर्तनाचा निर्देश करण्यासाठी भूमिका वर्तन हि संकल्पना वापरली जाते.

**३.भूमिका संच :**

प्रत्येक दर्जाशी संबधित अशा अनेक भूमिका असतात.एकाच व्यक्तीला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात.त्यामुळे त्याची भूमिका हि अनेक भूमिकांचा संच असते.उदा.मुख्यमंत्र्यान्या जनता,सहकारी मंत्री,कर्मचारी,कुटुंब,सार्वजनिक संस्था

यांच्याशी हि भूमिका पार पाडावी लागते,म्हणजे दर्जा एक पण भूमिका अनेक अशी स्थिती असते.

**४.भूमिका ताण -**

**5.भूमिका संघर्ष -**

**6. भूमिका प्राधान्य -**

## ➢ दर्जा व भूमिका यांचे महत्व :

आधुनिक काळात व्यक्तीला तिच्या दर्जानुसार अधिक महत्व प्राप्त झाले आहे.आधुनिक समाजात स्तरीकरण हे दर्जा आणि भूमिका यांच्याशी निगडीत आहे.प्रत्येक व्यक्ती समाजात उच्च दर्जा प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असते.त्याचबरोबर व्यक्तीला आपल्या दर्जाला अनुसरून कुशल भूमिका पार पाडावी लागते.दर्जा व भूमिका यांचे संबंध व्यक्तीच्या तसेच समाजाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत.दर्जा व भूमिका यांच्यामुळे सामाजिक व्यवहारात स्थिरता व निश्चितता येते.सामाजिक व्यवस्थेला स्थिरता प्राप्त होते.मानवी सामुहिक जीवनाचे आकलन करून घेवून सामुहिक जीवनाची  वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यासाठी दर्जा व भूमिका या संकल्पना महत्वाच्या आहेत.

## २. सामाजिक नियमने आणि मुल्ये :

**प्रस्तावना :**

व्यक्तीचे समाजातील वर्तन हे सामाजिक नियमंनानी बांधलेले असते आणि हि सामाजिक नियमने मुल्यांवर आधारीत असतात.व्यक्तीचे वर्तन आणि सामाजिक वर्तनाचे नियमन करण्यासाठी अशी नियमने समाजात निर्माण होत असतात.परिणामी व्यक्तीच्या वर्तनावर मर्यादा पडत असतात.

### ❖ सामाजिक नियमने :

समाजात विविध दर्जावर असणाऱ्या व्यक्तींनी आपल्या भूमिका पार पाडताना कसे वागावे व कसे वागू नये याबाबतचे जे नियम,प्रमाणके असतात त्यांनाच सामाजिक नियमने असे म्हटले जाते.समाजात सुसंगतता निर्माण करण्याचे कार्य नियमने करीत असतात.लोकांच्या प्रवृत्तीवर अशा नियमनांचा प्रभाव पडत असतो.सामाजिक नियमने हे मानवी समाजाचे वैशिष्ट्ये आहे,कारण नियमनाशिवाय कोणताही मानवी समाज असू शकत नाही.हि नियमने म्हणजेच वर्तनविषयक बंधने असतात.प्रथा,परंपरा,नीती,कायदे अशा स्वरुपात हि नियमने समाजात आपले कार्य करत असतात.

**Social Norms** हा शब्द सर्वप्रथम **शेरीफ** या विचारवंताने वापरला,तेंव्हापासून सामाजिक नियमनाच्या अभ्यासाला चालना मिळाली.

**व्याख्या :**

**१.जॉन्सन :**

**‘वर्तनावर निश्चित मर्यादा घालणारा,मनात बाळगलेला अमूर्त नमुना म्हणजे नियमने होय’.**

**२.हॉर्तन :**

**'व्यक्तीच्या वर्तनाविषयीच्या समूहाच्या अपेक्षा व्यक्त करणारी संकल्पना म्हणजे नियमने होय'.**

## ➢ सामाजिक नियमनाची वैशिष्ट्ये :

१.सामाजिक नियमने सर्व मानवी समाजात असतात

२.सामाजिक नियमने अमूर्त असतात.

३.सामाजिक नियमने स्थल,काल,परिस्थिती आणि सामाजिक स्थान सापेक्ष असतात.

४.नियमने निश्चयात्मक व निषेधात्मक अशा दोन्ही स्वरुपाची असतात.

5.नियमनांना संबधित समूहाचा व समाजाचा पाठिंबा असतो.

6.सामाजिक नियमने समाजाच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त असतात.

७.सामाजिक नियमनांचे व्यक्तीकडून आंतरीकरण होते.

## ➢ सामाजिक नियमनाचे प्रकार :

सामाजिक नियमने अनेक प्रकारची आहेत.प्रत्येक समूहात किंवा समाजात सामाजिक नियमनाची व्यवस्था पहावयास मिळते.नियमनानुसार आणि समाजाच्या अपेक्षेनुसार सर्व व्यक्तींचे वर्तन होतेच असे नाही.अशावेळी नियमनांचे उल्लंघन केल्यास शिक्षाही केली जाते.या सर्व गोष्टींना अनुसरून सामाजिक नियमनांचे विविध प्रकार पाडले जातात ते पुढीलप्रमाणे ...

**१.लोकरूढी -**

**लोकरूढी** हा शब्द सर्वप्रथम **विल्यम सम्नेर** यांनी उपयोगात आणलेला आहे.

समाजमान्यता मिळालेले किंवा मान्य म्हणून स्वीकारलेले वर्तनप्रकार म्हणजे लोकरूढी होय.

**२.लोकनीती -**

**लोकनीती** ही संकल्पना देखिल **विल्यम सम्नेर** यांनी स्पष्ट केलेली आहे.

सामाजिक रचनेचा कल्याणासाठी केंद्रीय महत्वाची अशी जी नियमने असतात त्यांना लोकनीती म्हणतात.

**३.कायदे -**

जेंव्हा लोकनीतिच्या अंमलबजावणीसाठी एखादी खास संघटना निर्माण केली जाते तेंव्हा त्या लोकनीतिना कायदे म्हणतात.

**४.प्रथा - परंपरा -**

**5.चालीरीती -**

- **मुल्ये -**

मुल्ये म्हणजे असे आदर्श कि ज्यांना अनुसरून माणसे आपली ध्येये ठरवितात,आपले मार्ग निवडतात आणि आपले व इतरांचे मूल्यमापन करतात.मुल्ये ही सर्वसाधारण स्वरुपाची तत्वे असतात.कोणत्याही गोष्टीची इष्टानिष्टता,योग्यायोग्यता ज्या निकषांच्या आदर्शांच्या आधारे ठरविले जाते त्यांना मुल्ये असे म्हणतात.

‘मूल्य म्हणजे एक असे सांस्कृतिक किंवा व्यक्तिगत मानदंड कि ज्याच्या आधारे आपण वेगवेगळ्या गोष्टींमध्ये तुलना करतो.काही गोष्टी मान्य व इतर अमान्य ठरवितो.काही चांगल्या व इतर वाईट,काही बरोबर तर काही चूक मानतो’.

मूल्यांच्या आधारे आपण आपले विचार,आचार,भावभावना,ध्येये,साधने इ.योग्यायोग्यता ठरवीत असतो. सत्य, अहिंसा, समता, स्वातंत्र, लोकशाही, शौर्य, माणुसकी इ.मुल्यांची काही उदाहरणे आहेत.प्रत्येक समाजाची स्वताची अशी काही मुल्ये असतात.अशा मूल्यांना समाज महत्व देत असतो.हि मुल्ये आदर्श म्हणून संपूर्ण समाजाला मार्गदर्शक म्हणून दिशा देण्याचे कार्य करीत असतात.सामाजिक मुल्ये हीच समाजाच्या सरंचनेच्या स्थिरतेचा महत्वाचा आधार आहेत.त्यामुळेच मूल्यांना सामाजिक सरंचनेचा महत्वाचा घटक म्हणून ओळखले जाते.

## ❖ सामाजिक नियमने आणि मुल्ये यांच्यातील संबंध :

सामाजिक नियमने आणि मुल्ये समाजाच्या सरंचनेचे घटक असले तरी त्यांच्यातील भेद,फरक खूपच अस्पष्ट आहेत.त्यांच्यात घनिष्ठ संबंध आहेत.दोन्हीही व्यक्तीच्या व समूहाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात.नियमने ही व्यक्तीने विशिष्ट परिस्थितीत कसे वागावे हे सांगतात.याउलट मुल्ये ही सर्वच परस्थितीत व्यक्तीने कसे वागावे हे सांगत असतात.सामाजिक मूल्यांना नियमनांचे उगमस्थान मानले जाते.त्यामुळे नियमने व मुल्ये लोकांनी आत्मसात करावीत, यासाठी समाज नेहमी प्रयत्नशील असतो.